म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा.
द. क्र. ३८४४

# प्रकाश

IRBK-0103844
IRBK-0103844

ग्रं. स. ठाणे
...ळ- वाङ्मय
७१९



# संघकारी

—मधु पान्वलकर

जसत्ता प्रकाशन १

नोंद क्र. ०३८

# जयप्रकाश नारायण

ग्रंथ संग्रहालय
नों. क्र. ११७८५
३८४४
वा. वा.
मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. वा.
ना. नं. ७२०
वाचनालय शाखा

लेखक

मधु पान्वलकर

प्रथमावृत्ति : जानेवारी १...

IRBK-0103844

IRBK-0103844

समाजसत्ता प्रकाशन, रत्नागिरी

किंमत चार आणे

## दोन शब्द

जयप्रकाशांचें व्यक्तित्व मला वशिष्ठांच्या पुराणप्रसिद्ध धेनूसारखें वाटतें. ऋषिवर्यांच्या विधायक तपश्चर्येची मूर्ति म्हणून ती नेहमीं वावरली, पण प्रसंग पडला तेव्हां तिनें आपल्या सौम्य शरीरांतूनच शस्त्रसज्ज सैनिकदलें निर्माण केलीं. जयप्रकाश शांत, संयत, धीरगंभीर वाटतात, पण त्यांच्या जीवनप्रवाहावर क्रांतीचें तुफान जरूर तेव्हां उठूं शकतें.

गांधी आणि मार्क्स या उभयतांकडून स्फूर्ति घेतलेला व विधायक वृत्ति आणि क्रांतिकारक तेजस्विता यांच्या समन्वयानें सिद्ध असलेला हा पुरुष नेता म्हणून लाभला हें या विभूतिनिघ्र देशांत ( आणि जगांत ) भारतीय समाजवाद्यांचें भाग्य होय. भांडवलशाहीचें प्रतिगामित्व आणि कम्युनिस्टांची अपक्रांति यांच्यावर विजय मिळविण्यासाठीं त्यांना विधायक आणि क्रांतिकारक अशा उभयविध आंदोलनाचीच कांस धरली पाहिजे. नेत्याची वृत्ति आणि आंदोलनाची प्रवृत्ति यांच्यामध्यें अशी अभिजात संगति असावी हा एक शुभ योगायोगच म्हटला पाहिजे.

माझे तरुण मित्र श्री मधु पान्वलकर यांनीं अवघ्या चाळीस पृष्ठांत जयप्रकाशांचें समृद्ध जीवनचित्र प्रसंगरेखा आणि गुणच्छटा यांच्या साहाय्यानें सुरेख रंगवावें हें लेखणीचें मोठेंच यश होय.

दादर
२६-१२-१९५०

—प्रभाकर पाध्ये

मुखपृष्ठ : राम राजाध्यक्ष

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशक : भाऊ तेंडुलकर, संपादक समाजसत्ता, रत्नागिरी.
मुद्रक : श्रीरंग वरेरकर, साधना प्रेस, आर्थर रोड, मुंबई ११.

ग्रंथ संग्रहालय

# जयप्रकाश नारायण

१९२९ सालची गोष्ट. जवाहरलालजींच्या अध्यक्षतेखालीं लाहोरला कॉंग्रेसचें अधिवेशन भरणार होतें. महात्मा गांधी अधिवेशनाला हजर राहाण्यासाठीं तिकडे निघाले होते. त्यांच्या परिवारांत त्यावेळीं एक अगदीं नवा चेहरा आढळून येत होता. पुरेपूर सहा फूट,उंची आणि उंचीला शोभेशीच दणकट आणि गोरीपान शरीरयष्टी ! चेहऱ्यावर स्मित आणि आवाजांत कमालीची मृदुता ! ! सात वर्षें उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेंत राहून आलेला आणि नुकताच बनारस विश्वविद्यालयांत नियुक्त झालेला तो समाज-शास्त्राचा प्राध्यापक होता. गांधीजीनीं म्हटलें म्हणून स्वारी चालली होती लाहोरला, दुसरें काय ?

ही लाहोरची सफर जितक्या अकल्पितपणें घडून आली तितकाच तिचा परिणामहि आश्चर्यजनक झाला. थोर माणसांच्या जीव-नांत अशा किरकोळ पण महत्त्वाच्या घटना हटकून आढळतात. दररोज शेंकडों लोक मरत असतां त्यांतल्या एकाच्या दर्शनानें भगवान् बुद्ध विरघळला आणि पूर्वीं अनेक वेळां "शुभमंगल साव-धान"च्या आरोळ्या ऐकूनहि एक दिवस अचानकपणें रामदासांच्या

ध्यानांत त्याचा अर्थ आला. महात्मा गांधींचा व सत्याग्रह शास्त्राचा जन्म असाच आहे. "काला आदमी" म्हणून त्यांचा दक्षिण आफ्रिकेंत उपहास झाला. आगगाडींतून त्यांना खालीं खेंचण्यांत आलें आणि पदोपदीं अपमान झाला तो इतका कीं त्यांतूनच शांततामय प्रतिकाराचा उदय झाला. त्यांच्या महात्मतेचा तो जणूं पायाच घातला गेला होता. जवाहरलालजींची महात्माजींशीं गांठ पडली नसती व त्यांच्याकडे ते आकर्षिले गेले नसते तर आंग्लविद्याविभूषित नेहरूंचा जीवनप्रवाह कुठें धांव घेणार होता? आज अगदीं सामान्य वाटणाऱ्या या घटनांनीं किती महत्त्वाचे परिणाम त्या त्या व्यक्तींच्या जीवनावर घडवून आणले आहेत! समाजशास्त्राच्या प्राध्यापकाची लाहोरची फेरी अशीच क्रान्तिकारक ठरली आहे. भारताला एक महान् नेता त्यामुळें लाभला.

जवाहरलाल तेव्हांहि "गांधीमालें" तच वावरत असल्यानें गांधीजींच्या परिवारांत शिरलेला हा नवा माणूस त्यांच्या चटकन् नजरेंत भरला. त्यांनीं थोड्याच वेळांत त्याच्या अंगच्या गुणांची पारख केली आणि बनारस विश्वविद्यालयांत प्राध्यापक बनूं पाहाणाऱ्या त्या तरुणाला कॉंग्रेसच्या कामगार विभागाचा प्रमुख नेमून टाकलें. त्यानंतर दोन वर्षांच्या आंतच तुरुंगाची वाट चालतां चालतां कॉंग्रेसचा सरचिटणीस म्हणूनहि त्याची नेमणूक जवाहरलालजींनीं केली.

समाजशास्त्राचा प्राध्यापक, कामगार विभागाचा प्रमुख व कॉंग्रेसचा संग्रामकालीन चिटणीस म्हणजेच आजचे साथी जयप्रकाश

नारायण होत ! जयप्रकाशजींच्या राजकीय जीवनाची सुरुवात ही अशी आहे.

## भारताची आशा

साथी जयप्रकाश नारायण ही हिंदी राजकारणांतील एक प्रभावी शक्ति आहे. ज्या कांहीं थोड्या व्यक्तींवर राष्ट्राचें भवितव्य अवलंबून असतें अशा मोजक्या विभूतींत जयप्रकाशजींची गणना होते. दीडशें वर्षांच्या पारतंत्र्यानंतर स्वतंत्र झालेला भारत आज कमालीचा अस्थिर व अस्वस्थ आहे आणि सुखी व समृद्ध भविष्यकाळासाठीं त्याचे डोळे जयप्रकाशजींवर खिळले आहेत. जयप्रकाश हीच भारताची एकमेव आशा आहे.

## सारणची देणगी

जयप्रकाश नारायण ही बिहारमधील सारण जिल्ह्याची देणगी होय. सिताबदियारा नामक खेडेगांवांत ४८ वर्षांपूर्वीं ते जन्मले. त्या-दिवशीं विजयादशमी होती. स्वतंत्र भारताचा समाजवादी नेता १९०२ सालीं सनातनी वृत्तीच्या सरकारी अधिकाऱ्याचे कुटुंबांत जन्म पावला. इतिहासनिर्मात्याला आपण जन्म दिला याचें ज्ञान माता-पित्यांना आणि १९०२ सालाला असणार तरी कसें ?

जयप्रकाशांचें बालपण कोणाच्या फारसें लक्षांत न येण्या-सारखेंच होतें. आपल्या अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींकडे त्यांचें लक्षच नसे. खूप अभ्यास करावयाचा, सुंदर सुंदर पुस्तकें वाचा-वयाचीं व परिक्षेंत पहिल्या क्रमांकाला पास व्हावयाचें एवढेंच त्यांना

ठाऊक होतें. आणि त्या खेड्यांत दुसरें करणार तरी काय ? वेळ घालविणाऱ्या चैनीच्या वस्तू तेव्हां खेड्यांपर्यंत जाऊन पोंचल्या नव्हत्या. घर आणि शाळा यांत घोटाळणाऱ्या या शांत व अबोल मुलानें वयाच्या सतराव्या वर्षीच सबंध बिहार प्रांताला पहिला धक्का दिला. जयप्रकाश त्या वर्षी पाटणा युनिव्हर्सिटीच्या प्रवेशपरीक्षेंत पहिल्या क्रमांकाला उत्तीर्ण झाले.

## कॉलेज प्रवेश आणि नंतर

जयप्रकाशांना आतां जन्मग्राम सोडावें लागलें. कॉलेजशिक्षणासाठीं ते पाटण्याला येऊन राहिले. बरोबर धाकटा भाऊहि होता. पण विश्वविद्यालयांतहि त्यांच्या वागण्यांत बदल झाला नाहीं. पूर्वी नसलेली देशभक्तीची भावना वाढत्या वयाबरोबर मनांत घर करूं लागली, पण तरीहि भरपूर अभ्यास, हुशार मुलांचीच संगत आणि चैनीबद्दल उदासीनता हेच त्यांचे त्यावेळचे स्वभावविशेष होते. बंधूंनाहि तेच धडे त्यानीं दिले.

पुस्तकांतच रमून जाणारा १९२० सालांतला हा कॉलेजकुमार १०।१५ वर्षांनंतर राष्ट्राचा पुढारी होईल असें त्यावेळीं कुणाला तरी वाटलें असेल काय ? जयप्रकाश असे पुस्तकांत डोकें खुपसून बसत तर त्यांचे सनातनी पिताजी निराळाच विचार मनांत खेळवीत. आपल्याप्रमाणें आपला मुलगा सरकारी नोकरींत लावून दिला कीं झाली आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता, असें मानणाऱ्या पिताजींची इच्छा जयप्रकाश कशी डावलणार ? पण जयप्रकाशानीं २१ सालीं

प्रत्यक्ष कृतीनेंच या प्रश्नाचें उत्तर दिलें. पाटणा विश्वविद्यालयांत तेव्हां ते इंटरसायन्सच्या वर्गांत शिकत होते. गांधीजीनीं राष्ट्राचें पुढारीपण स्वीकारलें होतें आणि असहकाराचा आदेश राष्ट्राला दिला होता. शाळा–कॉलेजें–कोर्ट–कचेऱ्या सर्व ओस पडावींत, सरकारला राज्य चालविणें अशक्य करावें अशी योजना होती. गांधीजीनीं दिलेल्या हांकेला साद न देणें जयप्रकाशांना शक्य नव्हतें. पिताजींच्या विरोधाला न जुमानतां त्यांनीं कॉलेज सोडलें, असहकाराच्या चळवळींत दाखल झाले आणि इकडे महात्माजीनीं आपली चळवळ मागें घेतल्याचें जाहीर केलें ! अहिंसक प्रतिकाराचा गांधीजींचा प्रयोग फसला होता. चौरीचौऱ्यांत झालेल्या दंग्यामुळें शांततेला धोका पोंचला होता. कसलाहि विचार न करतां त्यांनीं लढा बंद केला.

या घटनेला सत्याग्रहशास्त्रांत असेल कदाचित् महत्त्वाचें स्थान, परंतु गांधीजींच्या हांकेला " ओ " देऊन तरुणांची जी पिढी शिक्षणाचा व क्वचित् घरादारांचा त्याग करून राजकारणांत दाखल झाली तिला मात्र गांधीजीनीं घोटाळ्यांत टाकलें. स्वराज्याची लढाई फसली, अहिंसेचा प्रयोग निकामी ठरला आणि कायदेमंडळांत जाण्याचें दास–मोतिलाल नेहरूंचें राजकारण सुरू झालें. नव्या दमाच्या तरुणांना प्रश्न पडला–" याचसाठीं का आपण शिक्षणाचा त्याग करून देशभक्तीची दीक्षा घेतली ? " उत्साह पार मावळला आणि " पुढें काय ? " याचा ते विचार करूं लागले. जयप्रकाशांसमोर हाच प्रश्न होता.

## अमेरिकेच्या वाटेवर

आणि एक दिवस तें प्रश्नचिन्ह दूर झालें. " पुढें काय ? " या प्रश्नाचें उत्तर " अमेरिका " असें त्यांना मिळालें. स्वामी सत्यदेव नांवाच्या गृहस्थांनीं अमेरिकेंतील विद्यार्थीजीवनाचें रेखाटलेलें चित्र जयप्रकाशांना फार मनोरम वाटलें. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं त्यांना अमेरिका दिसूं लागली. परंतु हजारों मैल अंतर मध्यें होतें. प्रवासाला व पुढील शिक्षणासाठीं हजारों रुपये खर्च होणार होते. पुन्हा अडचण आली. पण एकदां ठरविल्यावर मग वेळ कसला ? अनेक प्रयत्न करून प्रवासापुरते पैसे त्यांनीं गोळा केले आणि आपल्या मित्रांबरोबरच भारताचा किनारा सोडला. दारिद्र्यानें गांजलेल्या सुवर्णभूमीचा निरोप घेऊन जियें खरोखरच सोन्याचा धूर निघत होता तिथें जाण्यासाठीं १९२२ सालीं ते निघाले. केवळ प्रवासापुरताच पैसा घेऊन उच्चशिक्षणासाठीं अमेरिकेसारख्या संपन्न देशांत जावयास निघणें हा वेडेपणाच नव्हता काय ?

## अमेरिकेंतील तपश्चर्या

एकादा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठीं आवश्यक ते सर्व प्रयत्न करायला माणूस तयार असला म्हणजे काय होणार नाहीं ? ठरविल्याप्रमाणें जयप्रकाश जपानमार्गें अमेरिकेला जाऊन पोंचले. अमेरिकन किनाऱ्यावर पाऊल ठेवतांना त्यांचें हृदय उत्साहानें भरून गेलें होतें. खिसा मात्र रिकामा होता. कॉलेजें सुरू होण्याची ती वेळ असती तर त्यांना कॉलेजमध्यें नांव नोंदविणें कांहीं

शक्य झालें नसतें. पण जयप्रकाशांना त्याचें फारसें कांहीं वाटलें नाहीं. हें असें होणार याची जर कल्पनाच होती, तर मग वाईट तें काय वाटणार ? उलट आपण अमेरिकेंत येऊन पोंचलों व ५० टक्के यश मिळविलें याचाच त्यांना आनंद वाटला.

अकल्पितपणें घडलेल्या अनेक घटनांनीं जयप्रकाशांना मदत केली आहे. यावेळींहि तसेंच झालें. कॉलेज सुरू व्हायला वेळ होता, तोंपर्यंत त्यानीं नोकरी करायचें ठरवलें आणि लवकरच त्यांना नोकरी मिळाली. कॅलिफोर्नियांतील फळांच्या मळ्यांत शीख व पठाणांच्या किती तरी टोळ्या काम करीत. त्यांतल्याच एका टोळींत जयप्रकाशांना आसरा मिळाला. गांधीजींच्या असहकाराच्या चळवळींत भाग घेण्यासाठीं शिक्षणत्याग केलेल्या या दमदार तरुणाला अेका अगडबंब देहाच्या व त्याचप्रमाणांत विशाल हृदयाच्या पठाणानें मोठ्या आदरानें आपल्या टोळींत दाखल करून घेतलें, भरपूर व सतत काम पुरविलें आणि सन्मानानें वागविलें. जयप्रकाश मांसाहार करीत नसत म्हणून जयप्रकाश होते तोंवर पठाणानें गोमांस कधीं टोळींत आणूं दिलें नाहीं. जयप्रकाशानींहि शक्य तितकें अधिक काम करून चार महिन्यांत कॉलेज शिक्षणासाठीं लागणारा पैसा जमा केला. केव्हां केव्हां दिवसाला १४ रुपये मजुरीहि त्यानीं मिळविली. चार महिन्यानंतर कॉलेजच्या टर्म्स सुरू झाल्या तेव्हां ते कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटींत दाखल झाले. निढळाच्या घामानें मिळविलेला पैसा त्यांना फार दिवस पुरणें शक्यच नव्हतें. एक टर्म पूर्ण झाली आणि जयप्रकाश पुन्हा नोकरी शोधूं लागले.

अमेरिकेंत जयप्रकाश सात वर्षें होते, निरनिराळ्या पांच युनिव्हर्सिटयांत त्यांनीं शिक्षण घेतलें आणि प्रत्येकवेळीं शिक्षण पुढें चालू ठेवण्यासाठीं मिळेल ती नोकरी केली. कधीं फळें वेंचणारा मजूर, कधीं हॉटेलमधील वेटर ! लायब्ररींतील पुस्तकें झाडण्यापासून लांकूड सामानाला पॉलिशनंतर वॉर्निश लावीपर्यंत सर्व प्रकारचीं कामें त्यांना करावीं लागलीं आणि शिक्षण पुरें करण्यासाठीं तीं त्यानीं केलीं. भगवान श्रीकृष्ण नव्हता का लहानपणीं गुराखी ? श्रम—मग ते कोणत्याहि प्रकारचे असोत—करण्यांत त्यांना कधीं अपमान वाटला नाहीं. एम्. ए.चा अभ्यासक्रम पुरा करणें म्हणूनच त्यांना शक्य झालें. ते एम्. ए. झाले तेव्हां ओहिओ विद्यापीठांत होते.

## विज्ञानशास्त्र सुटलें

जयप्रकाश अमेरिकेंतून परतले तेव्हां त्यानीं केवळ पदवीच बरोबर आणली नाहीं, एक नवा संदेश ते आपल्या बांधवांसाठीं घेऊन आले. दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमासाठीं त्यानीं विस्कॉन्सीन युनिव्हर्सिटींत नांव घातलें होते. तिथें त्यानीं जर्मन भाषा दुय्यम भाषा म्हणून घेतली होती आणि त्या भाषेचा प्राध्यापक मार्क्सवादी होता. जयप्रकाशांची त्या प्राध्यापकांशीं ओळख झाली. सारें जीवनच इथपासून बदललें. जयप्रकाशांच्या विचारांना या प्राध्यापकानीं एक महत्त्वाचें वळण दिलें. समाजवादी विचारांचें बाळकडू त्यानीं जयप्रकाशांना पाजलें आणि शिष्य लवकरच गुरुइतका तरबेज झाला. अभ्यास-नोकरी चालू असतांच बरेंचसें मार्क्सवादी वाङ्मय त्यानीं वाचून काढलें.

याचा परिणाम असा झाला कीं विज्ञानशास्त्राची पदवी घ्यायला गेलेले जयप्रकाश अखेर समाजशास्त्र हा विषय घेऊन एम्. ए. झाले आणि त्याच विषयांत डॉक्टोरेट मिळविण्यासाठीं पुढील अभ्यासाकडे ते वळले. पण तेवढा वेळ ते अमेरिकेंत थांबू शकले नाहींत. मातृभूमीपासून सात वर्षे दूर राहिल्यामुळें व आईच्या आजारीपणाची वार्ता समजल्यामुळें २९ सालीं त्यांनीं पुनश्च मातृभूमीकडे तोंड फिरवलें. अमेरिकेंत त्यांनीं काढलेलीं सात वर्षे म्हणजे त्यांच्या विशाल व्यक्तिमत्त्वाचा मजबूत पायाच होय. एक प्रकारची ती तपश्चर्याच होती आणि ती फळालाहि आली. आजहि अमेरिकेंतील तीं सात वर्षे जयप्रकाशांना आठवतात. बाकी भारताच्या समाजवादी नेत्याचें शिक्षण भांडवलशाहीच्या माहेरवरीं झालें व समाजवादाची दीक्षा त्यानें तिथेंच घेतली हा योगायोग मात्र आश्चर्यजनक आहे. स्वातंत्र्याचें प्रतीक बनलेल्या जवाहरलालजींचें शिक्षण देशाला गुलामींत ठेवणारांच्याच शिक्षणसंस्थांत झालें नव्हतें काय ? यापेक्षांहि मौजेची गोष्ट म्हणजे साथी जयप्रकाश तीस सालीं कांहीं दिवस शेठ बिर्लांचे प्रायव्हेट सेक्रेटरीहि होते !

## पहिला तुरुंगवास

तीस सालीं सत्याग्रहाच्या चळवळींत सामील झाल्यावरून त्यांना सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा दिली गेली. जयप्रकाशजींची ही पहिली जेलयात्रा होय. तिच्याच धसक्यानें जयप्रकाशांची आई स्वर्गवासी झाली. तुरुंगवासांतून मुक्त झाल्यावर मध्यंतरीं बंद असलेला

कामगार विभाग त्यांनीं पुन्हा सुरू केला. पण तेंहि काम त्यांना फार काळ करतां आलें नाहीं, कारण स्वातंत्र्यलढ्याचा दुसरा भाग सुरू झाला व जवाहरलालजींच्या पाठोपाठ जयप्रकाश काँग्रेसचे सर चिटणीस बनले.

## भूमिगत चळवळीचा यशस्वी पाठ

जयप्रकाश नारायण ही व्यक्ति तेव्हां अप्रसिद्ध होती आणि त्यामुळेंच त्यांना भूमिगत चळवळीचा पाठ गिरवायला मिळाला. जयप्रकाशांच्या सहीचीं हजारों पत्रकें खेडयाखेड्यांत पोंचलीं होतीं. खुद्द जयप्रकाश सर्व प्रांतांत मुक्त संचार करीत असत, परंतु बरेच दिवस ती व्यक्ति शोधून काढायला पोलिस खात्याला खर्च करावे लागले. मद्रासला ते पोलिसांना मिळाले, पण तेंहि पं. मालवीयजींमुळें ! पार्लमेंटरी शिष्टमंडळाबरोबर फिरण्याचा त्यांनीं जयप्रकाशांना आदेश दिला. त्यांची कल्पना अशी कीं शिष्टमंडळाबरोबर फिरल्यावर अटक होणार नाहीं. पण स्टेशनवर उतरतांच पोलिसांनीं त्यांचें स्वागत केलें! नाहीं तर आणखी कांहीं काल ते चळवळीचें मार्गदर्शन करीत फिरत राहिले असते. ४२ च्या आंदोलनांत त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांना भूमिगत चळवळीची जी दिशा दाखविली ती याच आधारावर होय.

या बिहारच्या वीराला मद्रासेंत कैद करून महाराष्ट्रांत तुरुंगांत डांबण्याची चोख व्यवस्था नोकरशाहीनें करून ठेवली, परंतु त्यांतूनच इतिहास निर्माण झाला, ज्वलज्जहाल देशभक्तांचा गट संघटित झाला.

## जीवनेतिहासांतील नवें पान

जयप्रकाशांना नाशिकमध्यें आणलें तेव्हां तिथें आधींच तरुण तरुण देशभक्तांचा एक मेळावा जमला होता. युसुफ मेहेरअली, अच्युत पटवर्धन, अशोक मेहता, मिनू मसानी, नारायणराव गोरे, एस्. एम्. जोशी आदि तरुण कार्यकर्ते तिथें होते. जयप्रकाशजी त्यांच्याशीं लवकरच एकरूप झाले.

गांधीजींवर जयप्रकाशांची अपार श्रद्धा. अमेरिकेंतून परत फिरतांना ते समाजवादी बनून आले तरी गांधीजींवरील त्यांची श्रद्धा कमी झाली नाहीं. अमेरिकेंत जातांना आपल्या पत्नीला—प्रभावतीदेवींना त्यांनीं गांधींच्या आश्रमांत ठेवलें होतें आणि गांधीजीनीं तिला आपली मुलगी मानून ठेवून घेतलें होतें. परंतु गांधीजींचें राजकारण अपयशी होत असल्याचा संशय येतांच त्यांच्या मार्गावरचा विश्वास डळमळूं लागला. लंडनवारी विफल ठरली, सत्याग्रह लढे फसले आणि स्वातंत्र्य-सैनिक निराश झाले. यापुढें निराळ्या मार्गाचा शोध केला पाहिजे असें वाटूं लागलें आणि त्याच सुमारास प्रतिगामी प्रवृत्तींनीं काँग्रेसमध्यें जोर धरण्यास सुरुवात केल्यामुळें समाजवादी विचारांच्या लोकांचाहि एखादा गट संघटित झाला पाहिजे हा विचार अधिक प्रभावी बनला. जयप्रकाशानीं बिहारमध्यें समाजवादी पक्ष पूर्वींच स्थापन केला होता. त्याच धर्तीवर काँग्रेसमध्येंच राहून काम करणारा अखिल भारतीय समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा निर्धार या तरुण मंडळींनीं केला. समाजवादी पक्षाची स्थापना अशा रीतीनें नाशिकच्या तुरुंगांत झाली.

अधिकृत स्थापना जाहीररीत्या व्हावयाची होती. इतकेंच; पण तेंहि अपूर्ण राहिलेलें काम पुरें करायला कीं काय कोण जाणे, जयप्रकाशजीं-सह वरील सर्व पुढारी बंधमुक्त होऊन लवकरच बाहेर आले.

जयप्रकाशानीं सबंध देशांतील प्रमुख समाजवाद्यांशीं संबंध जोडले आणि १९३४ च्या एप्रिलमध्यें पाटणा येथें एक परिषद भरवून "कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टी" स्थापन झाल्याचें घोषित करण्यांत आलें. आचार्य नरेंद्र देवांसारख्या अनुभवी पुढाऱ्याचें मार्गदर्शन मिळालें आणि जयप्रकाश पक्षाचे पहिले चिटणीस बनले.

येथपासून पुढें जयप्रकाशजींचें जीवन चरित्र म्हणजे सोशलिस्ट पार्टीचा इतिहासच होय !

## समाजवादी पक्षाची उभारणी

पाटण्याच्या पहिल्या अधिवेशनांत चिटणीस म्हणून निवड झाल्यावर पक्षाची संघटना करण्याचें काम जयप्रकाशानीं हातीं घेतलें. अखंड परिश्रमांनीं त्यानीं पक्ष संघटित केला. त्यासाठीं वर्किंग कमिटी-वर निवड होण्याचा तेव्हां दुर्लभ असलेला मान मिळाला असतांहि तो त्यानीं साभार नाकारला. समाजवादी राजवटीचा पायाहि तसाच बळकट असायला हवा हें लक्षांत घेऊन समाजवादी पक्षाची उभारणी करण्याच्या कार्याला ते लागले. पाटण्याला १६ वर्षांपूर्वीं ते पक्षाचे चिटणीस बनले तेव्हांपासून परवां मद्रासला सरचिटणीसपद अशोक मेहतांच्या स्वाधीन करीपर्यंत बहुतेक सर्वकाळ हा कांटेरी मुकुट

वा. नं. ७२०

त्यांच्याच शिरावर होता. जयप्रकाश म्हणजे सोशलिस्ट पार्टी व सोशलिस्ट पार्टी म्हणजे जयप्रकाश हें समीकरण लोकांच्या तोंडीं इतकें खिळून बसलें आहे कीं आतां ते सर चिटणीस नसले तरी पक्षाचा " प्रवक्ता नं. १. " म्हणून जयप्रकाशानांच अजूनहि मान मिळतो, कारण सोशलिस्ट पार्टी हें जयप्रकाशजींच्या कर्तृत्वशक्तीचें दृश्यफळ होय हें ते जाणतात.

३८४४

## पक्षसंघटनेसाठीं

प्रथम बिहारच्या पक्षशाखेकडे त्यांनीं लक्ष दिलें. पूर्वीपासून ती पक्ष काम करीत होताच. त्यालाच व्यवस्थित स्वरूप आणून दिलें आणि मग ते इतरत्र वळले. सर्व प्रांतांत त्यांनीं दौरा केला, पक्ष-शाखा स्थापन केल्या, पक्षाचें धोरण व कार्यक्रम निश्चित करून तो देशासमोर मांडला, त्याला पाठिंबा मिळविण्यासाठीं सर्वत्र प्रचार मोहीम सुरू केली. " कॉंग्रेस सोशलिस्ट नांवाचें इंग्रजी साप्ताहिक अशोक मेहतांच्या मदतीनें चालविलें, आणि "Why Socialism"—समाजवादच कां ? या नांवाचा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. पुरोगामी शक्ति प्रभावी व्हाव्यात म्हणून सर्व डाव्या पक्षांचें एकीकरण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. कम्युनिस्टांच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष करून त्यांच्याशीं दोस्ती करण्यासहि कमी केलें नाहीं. एकदां तर आपल्या निकटवर्ति सहकाऱ्यांचे राजीनामे स्वीकारून त्यांनीं टाकलेलें पाऊल मागें घेण्यास नकार दिला. कम्युनिस्टांनीं तेव्हां समाजवादी पक्षाला नामशेष करण्याचा जणुं विडाच उचलला होता. फूटपाडेपणाचे

कौशल्यपूर्ण प्रयोग त्यांनीं जयप्रकाशांवर केले; जयप्रकाशांना खूपच नुकसान सोसावें लागलें, पण "डाव्यांच्या एकजुटी"नें गाजलेल्या ३–४ वर्षांतील अनुभवानें ते शहाणे झाले. कम्युनिस्टांबरोबरचे सर्व संबंध मग त्यानीं सोडले आणि त्यांचे ते पक्के विरोधक बनले.

एका बाजूला कम्युनिस्टांचे हे पोरखेळ ऐन भरांत आले असतां दुसऱ्या बाजूला कॉंग्रेसमध्यें प्रतिगामी जोरदार बनत होते. दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल झपाट्यानें चालली होती. जयप्रकाशानीं या सर्व आघाड्यांवर सारख्याच जागरूकतेनें लक्ष ठेवलें आणि कम्युनिस्टांपासून पार्टीला अखेर वांचवलेंच पण सत्तास्वीकाराच्या मोहांत त्यानीं सोशलिस्टांना गुंतूं दिलें नाहीं आणि साम्राज्यवाद विरोधी–युद्धविरोधी–निर्भेळ स्वातंत्र्यवादी भूमिका कायम राखण्यांत यश मिळविलें.

## कॉंग्रेसची इभ्रत राखली

अधिकार स्वीकार करण्यास त्यांचा प्रथमपासून विरोधच होता. एकदां कॉंग्रेस सनदशीर राजकारणाच्या रथावर आरूढ झाली कीं त्यांतून ती कधींच खालीं उतरणार नाहीं, स्वातंत्र्यलक्ष्याकडे दुर्लक्ष होईल आणि व्यवहारवादाच्या नांवाखालीं ध्येयच्युती पत्करील अशी भीति जयप्रकाशांना वाटत होती. निवडणुकीचा प्रचार करीत म्हणूनच ते फारसे कुठें फिरले नाहींत. पण कांहीं प्रांतांत मंत्रिमंडळें बनलीं, कॉंग्रेस सत्तारूढ झाली. यावेळीं जयप्रकाश पुढें आले. कॉंग्रेसनें दिलेलीं आश्वासनें पूर्ण करून घेण्यासाठीं जनतेचें वजन

आणलें, मोर्चे काढले. एका प्रांतांत राजबंद्यांच्या प्रश्नावरून गव्हर्नरशीं झगडा झाला तेव्हां "मंत्र्यांनीं राजीनामे द्यावेत" अशी मागणी जय-प्रकाशानीं केली. पुष्कळ कॉंग्रेस श्रेष्ठी व मंत्री त्यांचेवर नाराज झाले, पण गांधीजींनीं त्यांचें म्हणणें मान्य केलें. जयप्रकाशानीं सुचविलेल्या मार्गाचा अवलंब करूनच अखेर गव्हर्नरला नमवावें लागलें.

## कॉंग्रेसच्या कायापालटाचे प्रयत्न

निवडणुकींत कॉंग्रेसनें दिलेलीं वचनें वाऱ्यावर जाऊं नयेत म्हणून त्यानीं जसे प्रयत्न केले, त्याचप्रमाणें कॉंग्रेस पुढारलेल्या मध्यम-वर्गाची मक्तेदार बनूं नये म्हणूनहि त्यानीं आटोकाट प्रयत्न केले. शस्त्रास्त्र–सज्ज साम्राज्य सत्तेबरोबर अनत्याचारी मार्गानें लढा देऊन विजय संपादन करायचा असेल तर कॉंग्रेसच्या घटनेंत महत्त्वाचा बदल घडवून आणला पाहिजे, हें त्यांना दिसत होतें. किसान आणि कामगार हीच खरी राष्ट्राची शक्ति, पण तिला जर कॉंग्रेसमध्यें योग्य तें स्थान नसेल तर साऱ्या राष्ट्राचें प्रतिनिधित्व करण्याचा हक्क कॉंग्रेसला कसा पोंचतो ? किसान व कामगारांच्या वर्गीय संघटना उभारून त्यांना कॉंग्रेसमध्यें दाखल करून घ्यावें असें त्यांचे मत होतें व तशी तरतूद घटनेंत करण्याचा प्रयत्नहि त्यानीं केला. परंतु कॉंग्रेसच्या "बड्या" पुढाऱ्यांना कांहीं हा विचार मानवला नाहीं. त्यांनीं अखेरपर्यंत जय-प्रकाशांना विरोधच केला आणि जयप्रकाश यावेळीं हरले. कॉंग्रेसमध्यें किसान–कामगारांना जागा करून द्यायला ते असमर्थ ठरले.

याच सुमारास हिंदी कामगार चळवळीच्या चिरफाळ्या

उडाल्या होत्या. कम्युनिस्टांच्या आपमतलबी कार्यपद्धतीमुळें ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस दुभंगली होती. बाल्यावस्थेंत असलेल्या हिंदी कामगार चळवळीचें तारूं मतभेदांच्या खडकावर आदळून फुटूं नये म्हणून ऐक्य निर्माण करण्याच्या उद्योगाला जयप्रकाश लागले. श्री एन्. एम्. जोशींच्यासारखे स्वतंत्र व कम्युनिस्ट हेच काय ते तेव्हां प्रामुख्यानें कामगार विभागांत काम करीत. सरकारी प्रतिनिधि म्हणून आंतरराष्ट्रीय परिषदांना त्यांच्यापैकींच कोणी तरी जाई. पण तरीहि जयप्रकाशानीं केलेल्या प्रयत्नांना यश आलें. दुभंगलेली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस पुन्हां एकसंध झाली; विविध प्रवृत्तींचे लोक कामगार चळवळींत वावरत असल्यानें ती एकजीव झाली नाहीं ही गोष्ट निराळी. कामगार सृष्टींतील जयप्रकाशजींची ही पहिली महत्त्वाची कामगिरी होय.

## युद्धाची ठिणगी पडली

दुसरें महायुद्ध अटळ आहे हें आतां सर्वांनाच कळून चुकलें होतें. युरोपमधील परिस्थिति अत्यंत स्फोटक बनली होती. आणि १ सप्टेंबर १९३९ ला स्फोट झाला. हिटलरच्या सेना पोलंडमध्यें घुसल्या. ३ सप्टेंबरला इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनीं पोलंडच्या वतीनें युद्धांत भाग घेतला. जागतिक युद्धाची ही सुरुवात होती. युद्धक्षेत्र हिंदुस्थानपासून पांच हजार मैलांवर होतें आणि हिंदुस्थान हा युद्धाचा तळ कधीच बनला नव्हता. तथापि साम्राज्यवादी सरकारनें आपल्याबरोबर हिंदुस्थानलाहि युद्धांत खेचलें. यांतूनच पुढील इतिहासाचा जन्म झाला.

## युद्धविरोध

हिंदी देशभक्तांनीं साहजिकच या कृतीचा निषेध केला. हिंदी जनता या युद्धापासून अलिप्त राहील असें त्यांनीं जाहीर केलें. परंतु सरकारवर त्याचा परिणाम थोडाच होणार होता ? कॉंग्रेसलाच मंत्रिपदें सोडून युद्धाला विरोध करावा लागला. ऑक्टोबरमध्यें बहुतेक सर्व मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिले. सरकारी ९३ कलमी राजवट सुरू झाली. जयप्रकाशानीं पाटण्याला प्रचंड प्रमाणावर सरकारविरोधी निदर्शनें घडवून आणलीं. बाहेर युद्ध सुरू असतां जयप्रकाशासारख्या बंडखोर नेत्याला सरकार मोकळा कसा ठेवील ? निदर्शनांबद्दल त्यांना शिक्षा झाली. त्यानंतर युद्धविरोधी भाषण केल्याबद्दल त्यांना दुसरी शिक्षा मिळाली. यावेळीं जेलमधून ते बाहेर आले तेव्हां त्यांच्यापुढें कांहीं योजना होती. पुढील कामाबद्दल स्पष्ट कल्पना होती. युद्धविरोधी संघटना निर्माण करण्यासाठीं फिरत असतां त्यांना मुंबईत पकडण्यांत आलें. सरकार या खेपेला खटला भरण्याच्या भानगडींत पडलें नाहीं. जयप्रकाशाना स्थानबद्ध करण्यांत आलें आणि त्यांची रवानगी राजपुतान्याच्या वाळवंटांत उभारलेल्या छावणींत करण्यांत आली. हजारीबाग तुरुंगांतून ४२ च्या नोव्हेंबरांत निसटून जाईपर्यंत मग ते तुरुंगांतच होते. तुरुंगवास म्हणजे देशभक्तांच्या जीवनांतला फुकट गेलेला कालखंड होय. जयप्रकाशाना वाईट वाटलें तें याचेंच. बाहेर दिवसेंदिवस स्वातंत्र्यलढा पुकारण्याला अनुकूल वातावरण तयार होत होतें. या वातावरणाचा आपण फायदा

घेऊं शकत नाहीं ही गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिली. पुढें हजारीबाग जेलच्या भिंती ओलांडून याचें उट्टें त्यांनीं काढलें ती गोष्ट निराळी.

## देवळीच्या तुरुंगांत

देवळीचा तुरुंग म्हणजे नरकवासच होता. बऱ्याचशा कम्युनिस्टांना तेव्हां अटक झाली होती आणि देवळी कँप मुख्यतः त्यांच्यासाठींच होता. सोशलिस्ट किंवा इतर डावे लोक फारच थोड्या प्रमाणांत तिथें होते. सबंध देशांतील मार्क्सवादी लोक तिथें डांबून ठेवले होते. त्यांना त्या हवामानाचा त्रास होतो कीं काय या गोष्टीचा मुळीं विचारच केला गेला नव्हता. निरनिराळ्या दोन कँपमध्यें दोनशें कैदी होते. एका कँपचे लोक दुसऱ्या कँपमधील लोकांना भेटूं शकत नसत. दुसऱ्या कँपमधल्या लोकांना दिवसाला फक्त ६ आणे भत्ता मिळत असे. एकेका खोलींत १०।१० लोक होते आणि उन्हाळ्याच्या दिवसांतहि पंखे वगैरेंची सोय नव्हती. परप्रदेशांत येऊन पडलेल्या त्या लोकांची काय स्थिती झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. राजबंदी या अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या विचारांत असतांच जयप्रकाश देवळी कॅम्पमध्यें पोंचले. एकंदर परिस्थितीचें अवलोकन त्यांनीं केलें आणि राजबंद्यांच्या लढ्याचें नेतृत्व त्यांनीं आपल्याकडे घेतलें. सरकारनें पहिल्या प्रथम तर माघार घेतलीच. भत्ता वाढवून दिला, दोन्ही कॅम्पच्या लोकांना परस्परांना भेटण्याची परवानगी दिली, पंख्यांची सोय करण्याचें आश्वासन दिलें, पण तीं आश्वासनेंच

ठरलीं. राजबंद्यांना याची चीड आली आणि कांहीं कम्युनिस्टांचा विरोध होता तरी अन्नसत्याग्रहाला सुरुवात झाली. कम्युनिस्टहि त्यांत मग सामील झालेच. जयप्रकाशजींच्या ३३ दिवसांच्या उपोषणानंतर सरकारला माघार घ्यावी लागली आणि देवळीची छावणी नष्ट झाली. कारण राजबंद्यांना आपापल्या प्रांतांत हलविण्यांत यावें, हीच पहिली मागणी होती.

जयप्रकाशजींच्या जीवनचरित्रांत देवळीला दुहेरी महत्त्व प्राप्त झालें आहे. सर्वत्र देश हलवून सोडणारें हे जें आंदोलन झालें, त्याचें नेतृत्व जयप्रकाशांनीं केलें होतें आणि तुरुंगाच्या भिंतीआड अडकून पडले असतांहि बाहेर वावरणाऱ्या सोशलिस्ट कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचा एक धाडसी प्रयत्न त्यांनीं केला होता. प्रभावतीदेवी त्यांना भेटायला गेल्या असतां देवळी कँपची विस्तृत माहिती देणारें व जेलबाहेर असलेल्या सोशलिस्टांनीं कसें काम करावें याबद्दल स्पष्ट सूचना देणारें पत्र पुरुषोत्तम त्रिकमदासना देण्यासाठीं त्यांच्याकडे दिलें. पत्रें देण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला म्हणून जयप्रकाशनीं प्रभावतींना पुन्हा बोलावलें व पत्रें दिलीं. परंतु दुर्दैवानें तीं पत्रें पुरुषोत्तमदासना न मिळतां पोलिसांना मिळालीं. जयप्रकाशांचा संदेश सहकाऱ्यांपर्यंत कसा पोंचणार? तसा तो पोंचणें शक्यच नव्हतें, पण मॅक्सवेल साहेबांनीं तो पोंचविण्याचें श्रेय मिळविलें. जयप्रकाश अत्याचारी चळवळीचें संघटन करण्याच्या प्रयत्नांत आहेत, असें सिद्ध करून गांधीजी व जयप्रकाश

यांच्यांत कलह निर्माण करण्याच्या दुष्ट हेतूनें मॅक्सवेलनीं तीं पत्रें प्रसिद्ध केलीं. महात्मा गांधींपासून सर्व पत्रकारांनीं सरकारला चोख उत्तर दिल्यामुळें सरकारचा हेतु अर्थातच साध्य झाला नाहीं. सोशलिस्ट कार्यकर्त्यांना व पुढाऱ्यांना मात्र त्या पत्रकानें प्रकाश दाखवला. ९ ऑगस्ट उजाडण्यापूर्वी हजारों कांग्रेसजन बंदिस्त झाले, गांधीजींसह सारे पुढारी तुरुंगांत गेले पण तत्पूर्वीच प्रमुख समाजवादी नेते व असंख्य कार्यकर्ते भूमिगत झाले होते. हें जें दृश्य जगाला दिसलें, त्यांतच जयप्रकाशजींचा पत्रें लिहिण्यांतील हेतु साध्य झाल्याची साक्ष पटते. मॅक्सवेल ऐनवेळीं जयप्रकाशांच्या उपयोगीं पडला तो असा! गांधीजींनीं यावेळीं दाखविलेलें धाडस मात्र असामान्य होतें. जयप्रकाशांवरील आरोपांचा त्यांनीं निषेध केला आणि गांधीजींचा गांधीवाद व जयप्रकाशजींचा समाजवाद यांतील तात्विक विरोधाला व्यक्तिगत विरोधाचें स्वरूप देण्याचा साम्राज्यवादी कावा निष्फळ केला.

## साम्राज्यसत्तेकडून बहुमान

जयप्रकाशांच्या पत्रांचें प्रकरण जसें सरकारला महाग पडलें, तसाच देवळींतील त्यांचा मुक्कामहि अनिष्ट ठरला. सरकारची इच्छा नसतांना जयप्रकाशांना बिहारमध्यें पोंचविणें भाग पडलें. नंतर थोडयाच दिवसांत युद्धविरोधाच्या आरोपावरून पकडलेलें पं. नेहरू, नरेंद्र देव आदि थोर थोर नेते सुटले. पण जयप्रकाशांना त्यांची प्रकृति अत्यंत क्षीण झालेली असतांहि सरकारनें सोडलें नाहीं. इतर कुठल्याहि

पुढाऱ्यापेक्षां जयप्रकाश सरकारला अधिक धोकेबाज वाटले यांतच साम्राज्यसत्तेनें जयप्रकाशांचा सन्मान केला आहे.

अखेर क्रांतीच्या ठिणग्या पडल्याच ! जयप्रकाशांना तुरुंगांत डांबलें म्हणजे स्वराज्याची लढाई मंदावेल ही अपेक्षाच भोळसटपणाची नव्हे काय ? ४२ साल उजाडलें, दोस्तांना चोहोंकडे मार बसत होता, व आंतरराष्ट्रीय परिस्थिति गंभीर बनत होती. गांधीजींनीं वेळ साधली, स्वातंत्र्याचा अखेरचा संग्राम सुरू झाला. कॉंग्रेसच्या बहुतेक पुढाऱ्यांनीं तुरुंगवास पत्करला, जयप्रकाशजींच्या मार्गदर्शनाप्रमाणें सोशलिस्टांनीं मात्र एका गुप्त यंत्रणेमार्फत लढा चालू ठेवला.

## पिंजऱ्यांतून पक्षी उडाला

असेच तीन महिने लोटले, चळवळीचा भर ओसरूं लागला. हिंदी राजकारणांतील काळरात्र जणुं सुरू झाली होती. पण संपूर्ण काळोखाची रात्री अमावास्या म्हणजे पुढें येणाऱ्या प्रकाशाची नांदी, अंधाराची चढती कमान भंगल्याचा पुरावा !

आणि खरोखरच ती आमावास्या होती ! १९४२ सालच्या आश्विनांतील अमावास्या, दीपावलीचा दिवस. तशा त्या अंधारांत हजारीबाग जेलच्या भिंती ओलांडून पांच माणसें बाहेर आलीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेलमध्यें एकच कल्लोळ उडून गेला. अंधारांत चांचपडणाऱ्या स्वातंत्र्यभक्तांना “ प्रकाश ” लाभला ! स्वातंत्र्ययुद्धांतील शूर सैनिकांचें नेतृत्व करण्यासाठीं जयप्रकाश

नारायण ब्रिटिशांनीं उभारलेल्या तटबंदींतून सफाईदारपणें निसटले होते. मनांत आलें तें पार पाडण्यासाठीं ऐन विशींत असतां ज्यानें अडचणींचे हिमालय ओलांडले आहेत, त्याला ५।५० फूट उंचीच्या दगडी भिंतीची कसली चिंता ?

## बाह्य जगांतील खळबळ

जयप्रकाशांच्या आजादीमुळें आजादीच्या सैनिकांचे चेहरे उजळून गेले. डोळ्यांत तेल घालून गुप्त पोलिस सज्ज झाले, पकडून देणारांची बक्षिसी दररोज वाढत होती आणि राष्ट्रीयच नव्हे तर परराष्ट्रीय वृत्तपत्रांनींहि जयप्रकाशांच्या विमुक्तीला अफाट प्रसिद्धी दिली होती. सरकार चांगलेंच हादरून गेलें होतें. ऑगस्ट क्रांति आतां कोणतें वळण घेते इकडेच सर्वांचें लक्ष वेधलें. आश्चर्य व उत्सुकता यांच्या हिंदोळ्यावर देशबांधव झोके खात असतांच जयप्रकाशांच्या देशपर्यटनाला सुरुवात झाली होती.

अगदीं अल्पावधींतच जयप्रकाशानीं देशांतील वातावरणाचा अंदाज घेतला. आपल्या सहकाऱ्यांना गांठलें आणि कामाला प्रारंभ केला. स्वातंत्र्य सैनिकांना उद्देशून त्यानीं लिहिलेलीं पत्रें व अमेरिकन सैनिकांना आवाहन करणारें पत्रक भारताच्या कोनाकोंपऱ्यांत आढळून येऊं लागलें. चळवळीचा जोर वाढला परंतु तो जोर विझण्यापूर्वीं मोठ्या झालेल्या ज्योतीसारखा ठरला ! कारण तीव्रतम दडपशाहीमुळें शिथिलता आली. आंतरराष्ट्रीय परिस्थितींत फरक पडला. युद्धांत दोस्तांचें पारडें जड होऊं लागलें आणि पुन्हा एकदां समर्थापुढें

असमर्थांनीं, शस्त्रसज्जांपुढें शस्त्रहीनांनीं, अन्यायापुढें न्यायानें शरणागति दिली. निरभ्र होऊं लागलेलें आकाश मेघांनीं काळवंडून गेलें. दास्यशृंखलेचे कांहीं सांधे मोकळे झाल्यासारखे भासले, पण तो भासच ठरला. कारण जेवढ्या अकल्पितपणें जयप्रकाश स्वातंत्र्य–सैनिकांस येऊन मिळाले तेवढ्याच अकल्पितपणें स्वातंत्र्य सैनिकांतून त्यांना दूर नेण्यांत आलें. ऑगस्टक्रान्तीचा अग्रदूत क्रांतीचें लोण वायव्य सरहद्दीकडे नेत असतां वाटेंतच बंदिवान झाला. फ्रॉन्टि-अर मेल वेषांतर केलेल्या जयप्रकाशांना घेऊन वेगांत पळत होती—त्याहिपेक्षां अधिक वेगानें ऑगस्ट क्रांतीचें दुर्दैव जवळ येत होतें ! लाहोर येण्यापूर्वींच धांवत्या गाडींत चोहोंकडून पिस्तुलें रोखलीं गेलीं–नशिबाला दोष देत जयप्रकाशांना दुष्मनांच्या स्वाधीन व्हावें लागलें.

## ते दहा महिने !

जयप्रकाश उणेपुरे दहा महिने भूमिगत होते. तेवढ्या अवधींत त्यानीं ऑगस्टक्रांतींतील सर्व महत्त्वाच्या केंद्रांना भेटी दिल्या. कधीं प्रवासांत, कधीं तळघरांत, कधीं मुंबईच्या कामगार विभागांतील काळोख्या खोलींत—जयप्रकाश वावरत असत. बंगालच्या दुष्काळानें लक्षावधि लोक मरत असतां सरकार अस्तित्वांत तरी कसें राहूं शकतें याचें त्यांना आश्चर्य वाटे, पण परिस्थितीच अशी होती कीं लाचार होऊन लोकांनीं मृत्यूला कवटाळलें—पण वंगभूमि जणूं दफनभूमि बनली होती, तिथें क्रांतीचें बीज कसें रुजणार ?

आणि गांधीजींचें तें इतिहासप्रसिद्ध उपोषणहि याच दहा

महिन्यांतलें ! गांधीजींची प्रकृति चिंताजनक होती. डॉक्टर्सनीं त्यांना घेरून टाकलें होतें. इकडे जयप्रकाश–अच्युतराव "पुढें काय होणार?" याचा विचार करीत होते. राष्ट्रपित्याचे ते शेवटचे क्षण असतील काय ? आणि सरकार काय करील ? एकेक प्रश्न हृदयाचें पाणी करीत होता. पण सरकारनें अशुभाची वार्ता दडपायचेंच ठरवलें तर आपली तयारी असावी, म्हणून जयप्रकाशानीं मृत्युलेख लिहून ठेवला. साने गुरुजींनीं डोळ्यांनीं पाहिलेल्या या प्रसंगाचें वर्णन करून ठेवलें आहे. ते म्हणतात "किती दारुण प्रसंग ! महात्माजी देवाघरीं गेले असें मानून पत्रक लिहायचें ! जयप्रकाशांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. पण त्यांनीं अश्रु पुसले, आणि स्फुंदत स्फुंदत पत्रक लिहिलें" सुदैवानें या पत्रकाचा उपयोग करण्याची वेळ आली नाहीं. गांधीजींवरील संकट निवारलें गेलें. जयप्रकाशांना आनंद झाला. पण प्रथम त्यांनीं मनाला किती संयम घातला ! कर्तव्य करण्यासाठीं ते कठोर बनले, पण ते कांहीं कठोरहृदयी नाहींत. भूमिगत अवस्थेंत असतांना ३।४ लोक एकत्र असतील तर झोंपतांना सर्वांना पांघरूण आहे कीं नाहीं तें स्वतः पाहात. साने गुरुजी त्यांचे भूमिगतावस्थेंतील स्वयंपाकी ! एकदा ते जेवायला बसले. इतरांनीं उठतांना आपापलीं ताटें उचललीं, जयप्रकाशानींहि ताट उचलण्यासाठीं हात पुढें केला, पण गुरुजींनीं त्यांना ताट उचलूं दिलें नाहीं. जयप्रकाशानीं चटकन् सांगितलें—" इतरांनीं उचललीं ताटें, मग मीच कां उचलूं नये ?" " तुम्हीं मोठीं माणसें, मी करतों सारें !" अगदीं नम्रमणें सांगून गुरुजींनीं ताट उचललें. " तुमने यह अच्छा

नहीं किया !" असें गुरुजींना म्हणाले. एवढा मोठा पुढारी, परंतु सामान्य कार्यकर्त्यांबरोबर समानतेनें वागण्याची पद्धत! दहा महिने अशा तऱ्हेनें संपले आणि १८ सप्टेंबर १९४३ रोजीं जयप्रकाश—ऑगस्ट क्रांतीचा प्राण—पिस्तुलांच्या पहाऱ्यांत लाहोरच्या किल्ल्यांत पुन्हा बंदिवान् झाले.

## अनन्वित छळ

लाहोरच्या किल्ल्यांत जयप्रकाशांना नेलें तेव्हांच ते ओळखूं येईनासे झाले होते. प्रकृति खालावलेली, दाढी वाढलेली आणि अंगावर मुसलमानी पेहराव असा स्वारीचा थाट होता. अशा स्थितींत असतांनाच नानाप्रकारें त्यांचा छळ झाला. कित्येक रात्री त्यांना झोपूं दिलें नाहीं, कोणाला भेटूं दिलें नाहीं, वृत्तपत्राचें दर्शन नसे, हातापायांत लोखंडी श्रृंखला होत्या आणि फिरायला आवारांत सोडलें तर पिस्तुलधारी पोलिसांचा पहारा असायचा. कित्येक दिवसपर्यंत ते आहेत कुठें व त्यांचें काय झालें याचीच कोणाला वार्ता नव्हती. ज्या कायदेपंडितांनीं त्यांच्यावतीनें हायकोर्टांत जाण्याचें धाडस केलें त्यांनाच कायमचें तुरुंगांत डांबण्यांत आलें. त्यांच्यावतीनें केले गेलेले हेबिअस कॉर्पस अर्ज सुनावणीस आले तेव्हां वाटेल तो खोटा पुरावा दाखविण्यांत आला. उलट जयप्रकाशांना आपल्या वकीलांनाहि पुरेशी माहिती पुरवितां आली नाहीं. पंधरा महिने हें असें चालू होतें. पुढें पुढें वृत्तपत्रें मिळूं लागलीं. पण त्यांची चाळण झालेली असे. जयप्रकाश याला कंटाळले व त्यानीं पंजाबच्या गृहमंत्र्याला कळविलें

कीं " एकादा माणूस कायद्याच्या दृष्टीनें दोषी असेल तर फांशी द्या, परंतु माहिती मिळविण्यासाठीं असें छळणें बेकायदा आहे." लाहोरच्या किल्ल्यांत त्यावेळीं डॉ. राममनोहर लोहियाहि होते.

## मुक्तता

४५ सालीं बहुतेक सर्व राजबंदी सुटले. पण जयप्रकाश, लोहिया अजून बंदिखान्यांत होते. बदल झाला तो इतकाच कीं लाहोरच्या किल्ल्यांतून त्यांना आग्रा येथील किल्ल्यांत आणण्यांत आलें. आग्रा येथें आल्यावर आपल्या पत्नीला भेटण्याची परवानगी त्यांना मिळाली होती. आग्रा जेलमधील त्यांचें वास्तव्य १९४६ च्या एप्रिलमध्यें संपलें आणि भारताचे दोन समाजवादी नेते जयप्रकाश आणि डॉ. लोहिया अडीच वर्षांच्या बंदिवासानंतर मुक्त झाले.

## मतभेद वाढूं लागले

जयप्रकाश व लोहिया सुटल्यावर समाजवादी नेते काँग्रेस-नेत्यांना भेटले. ऑगस्ट क्रांतीबद्दल जुन्यांचे कांहीं आक्षेप होते, उलट-पक्षीं जुन्या नेत्यांचें धोरण प्रतिगामी असल्याची, निदान पुरोगामी नसल्याची, नव्यांची तक्रार होती. " ४२ ची क्रांति हिंसामय होती, ती काँग्रेसच्या धोरणांत बसत नाहीं." असें जुने म्हणत, तर " झाला हाच शेवटचा स्वातंत्र्य लढा. आतां लढा नाहीं." अशी भूमिका घेऊन नगरमधून बाहेर आलेल्या नेत्यांना नव्यांचा साफ विरोध होता. ऑगस्टवाद्यांबद्दल बोलतांना आचार्य कृपालानी म्हणाले होते :—

" The less said of them, the better. " आणि थोड्या अधिक प्रमाणांत सर्वच काँग्रेस नेत्यांची ऑगस्ट क्रांतीकडे पाहण्याची ही दृष्टि होती. ४२ सालीं निर्माण झालेलें नवें नेतृत्व—प्रगतिशील नेतृत्व—मान्य करायला काँग्रेसनेते तयार नव्हते. निर्माण झालेलें नवें नेतृत्व विकसित व्हावें ही गोष्ट त्यांच्या मनाला पटत नव्हती असें म्हटलें तर वस्तुस्थितीचा विपर्यास होणार नाहीं. तसें नसतें तर ऑगस्टक्रांतीकडे विश्वामित्राच्या ठेक्यांत पाहण्याची काय गरज होती ? आणि सोशलिस्ट पुढाऱ्यांचे सत्कार करूं नका असे फतवे काढण्याची तरी काय गरज होती ?

याचा परिणाम एवढाच झाला कीं मतभेद वाढत गेले. समाजवादी नेत्यांनीं आपले विचार गांधीजींसमोर मांडले, काँग्रेस अध्यक्षांना निवेदन केलें, आणि जाहीर पत्रकें व मुलाखतीद्वारां जनतेपुढें विवेचन केलें. जयप्रकाशजी तर एके ठिकाणीं स्पष्टपणें म्हणाले " आज आपण पराभूत झालों असलों, तरी आपली शक्ति कमी झाली असें मला वाटत नाहीं. ताकद निश्चितच वाढली आहे. जनसंघटना वाढवून तिच्यांत भर टाकली तर परकी सत्ता इथून घालवून द्यायला फार वेळ लागणार नाहीं. " जयप्रकाशांच्या या उद्गारांत त्यांच्या पुढील कार्यक्रमाची स्पष्ट कल्पना येते. काँग्रेस नेते मंत्रिपदाच्या रस्त्याकडे वळले आणि समाजवादी राष्ट्रांतील श्रमजीवि जनतेकडे वळले. दोघांचे रस्ते भिन्न आहेत, हें आतां सारेच ओळखून चुकले होते. पण अजूनपर्यंत तरी ते एकाच रस्त्याच्या उजव्या व डाव्या कडेनें मार्गक्रमण करीत होते !

## स्वातंत्र्यप्राप्ति, पण पाकिस्तानच्या मोबदल्यांत

सरदारांचा व्यवहारवाद अगदीं निराळ्या कारणामुळें यशस्वी ठरला. महायुद्धांत दोस्त जिंकले, पण तो विजय कांहीं इंग्लंडचा नव्हता. उलट युद्धपूर्व कालांतील पहिल्या दर्जाचें इंग्लंड युद्धोत्तर कालांत तिसऱ्या दर्जाला गेलें, हा त्याचा पराभवच म्हटला पाहिजे. हिंदुस्थानाएवढा देश ताब्यांत ठेवणें ही सुद्धां त्यांना एक कठीण गोष्ट वाटूं लागली. येथील लष्कराबद्दल त्यांना पुरेसा विश्वास उरला नाहीं. सत्तेचें दान हिंदी लोकांच्या हातावर सोडून मोकळें होण्याचा शहाणपणाचा एकच मार्ग उपलब्ध होता व तोच त्यांनीं चोखाळला. पण जातिवंत साप मरतां मरतांहि चावा घेण्यासाठीं आसुसलेला असतो ना ? इंग्रजांनीं जातां जातां तेंच केलें. वाटाघाटींच्या जाळ्यांत अडकलेल्या कॉंग्रेस श्रेष्ठींना पाकिस्तान स्वीकारण्यास त्यांनीं भाग पाडलें आणि पाकिस्तानची किंमत देऊन उर्वरित भारतानें आपलें स्वातंत्र्य विकत घेतलें. व्यवहारवादानें ध्येयवादावर मिळवलेला विजय अशा सोज्वळ शब्दांत या घटनेचें वर्णन पूर्ण होत असलें तरी परिस्थितीचें गांभीर्य त्यामुळें नष्ट होऊं शकत नाहीं. जयप्रकाश व इतर समाजवादी नेत्यांना हें सहन होत नव्हतें; परंतु जनता लढा करण्याच्या मनस्थितींत नव्हती आणि स्वातंत्र्याचा सौदा करायला नेते तयार झाले होते. जयप्रकाशांनीं अखेर तटस्थता स्वीकारली. नंतर कित्येक महिनेपर्यंत जयप्रकाशजींची तटस्थता हें विरोधकांच्या माऱ्याचें केंद्र बनून राहिलें होतें, पण आपल्या भूमिकेवर ते अखेरपर्यंत स्थिर होते.

नों. नं. ७१०८८

## मिळालें काय — साध्य कीं साधन ?

वाटाघाटीनें मिळालेल्या स्वातंत्र्यांतून आपले प्रश्न सुटतील असें त्यांना केव्हांच वाटलें नाहीं, कारण स्वातंत्र्य हें साधन आहे, साध्य नव्हे, अशी त्यांची ठाम समजूत होती. १५ ऑगस्ट आला आणि गेला, जयप्रकाशजींच्या धोरणांत त्यामुळें कांहीं आमूलाग्र बदल घडून आला नाहीं. ते आतां दुप्पट उत्साहानें कामाला लागले. परसत्ता गेली, तिचें रिकामें सिंहासन लोकसत्तेला मिळवून द्यावें म्हणून त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

## सूर्य मावळला !

अखंड हिंदुस्थानचें स्वप्न खेळविलेल्या महात्माजींना फाळणीनें असह्य वेदना झाल्या. काय करावें हें कळेनासें झालें. "समोर अंधार आहे" असे निराशेचे उद्‌गार त्यांचे तोंडांतून बाहेर पडले. आणि तें सत्य होतें. पारतंत्र्याच्या शेवटच्या एका वर्षांत जें झालें, त्याला गांधीजी टाळूं शकले नाहींत किंवा कॉंग्रेसच्या नेत्यांना व्यवहारवादाच्या फसव्या घोषणांपासून परावृत्त करूं शकले नाहींत. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं स्वातंत्र्याचा सूर्य उदयाचलावर आला खरा, पण त्या प्रभात-समयीं आकाशांत आलेली लाली आबालवृद्ध स्त्री-पुरुषांच्या रक्तानें आली होती. दाराशीं आलेल्या पाहुण्यांचे पायावर दूध घालण्याची चाल आहे. भारताच्या दाराशीं आलेल्या स्वातंत्र्यदेवतेचे पाय तिच्या बालकांच्या रक्तानें भरून गेले. काळानें दिलेला हा फटका गांधीजींनीं सहन केला आणि ते नौखालीकडे वळले. हलाहल प्राशनाचें

शंकराचें कार्य ते करीत होते, पग त्यांतच त्यांचा बळी गेला. ज्या प्रवृत्तीविरुद्ध ते जन्मभर झगडले त्याच प्रवृत्तीनें—व्यक्तीनें नव्हे—त्यांचा बळी घेतला. महापुरुषांच्या मालिकेंत आपल्या स्वतंत्र तेजानें चमकणारा विसाव्या शतकांतील थोर पुरुष भारताच्या अंगप्रत्यंगावर आपल्या जीवनाचे ठसे उमटवून निघून गेला.

जयप्रकाश आणि गांधी, दोन निरनिराळ्या तत्त्वज्ञानांचे प्रवक्ते म्हणून ओळखले जातात. हीं दोन तत्त्वज्ञानें परस्पर विरोधी आहेत, असेंहि मानलें जातें. परंतु त्यांच्यांत अतुल स्नेहभाव वसत होता, हेंहि आतां सर्वांना कळून चुकलें आहे. गांधीजींशीं तात्विक मतभेद असल्यानें ते भिन्न गोटांत वावरत असत. परंतु परस्परांबद्दल विश्वास होता, अेकमेकांची योग्यता दोघेहि ओळखून होते. म्हणूनच जयप्रकाशजींचा जो ठराव रामगड काँग्रेसपुढें येऊं शकला नाहीं, तो हरिजनमध्यें प्रसिद्ध करून एकदोन तपशीलाच्या बाबी वगळून सर्व ठरावाला आपला जाहीर पाठिंबा गांधीजींनीं व्यक्त केला. समाजवादी भारताचें चित्र या ठरावांत त्यानीं रेखाटलें होतें.

जयप्रकाशांबद्दलच्या त्यांच्या भावना देवळीच्या पत्र प्रकरणाचे वेळीं प्रकट झाल्याच होत्या. अहिंसेच्या प्रश्नावर जयप्रकाशांशीं मतभेद असतांहि सरकारनें जेव्हां त्यांना हिंसक ठरवलें तेव्हां गांधीजींनीं सरकारला विचारलें. " हिंसेवर आधारलेल्या सरकारला जयप्रकाशांना हिंसक ठरविण्याचा अधिकार काय ? उलट जयप्रकाशांसारखा पहिल्या दर्जाचा समाजवादी नेता आज जाहीरपणें असें सांगतो

कीं, माझ्या जीवनावर झालेला गांधीजींचा परिणाम मी नाकारूं शकत नाहीं. जयप्रकाशांना महात्माजींनीं समाजवादाचे आचार्य म्हणून संबोधलें आहे. " समाजवादाबद्दल जयप्रकाश जें जाणीत नाहींत, तें भारतांत कोणीच जाणीत नाहीं " असेहि अभिमानाचे उद्गार त्यांनीं एकदां काढले होते. जयप्रकाशजींच्या कर्तृत्वशक्तीची साक्ष त्यांच्या मनाला पटली होती, म्हणूनच अखेरच्या दिवसांत काँग्रेसचें नेतृत्व जयप्रकाशजींना द्यावें असें गांधीजींनीं सुचविलें होतें.

## काँग्रेसत्याग

पण काँग्रेसला कुठें नवें नेतृत्व हवें होतें ? ४२ च्या आंदोलनाचा मागील निवडणुकींत हवा तसा उपयोग करून घेणारांनींच पुढें या आंदोलनाच्या नेत्यांबद्दल बेफिकीरी दाखवली आणि वेळ आली तेव्हां आंदोलनाची जबाबदारी नाकारली. ही जबाबदारी नाकारण्यांत हिंसा–अहिंसेच्या तांत्रिक मुद्याचा फारच थोडा भाग होता. सवाल होता नव्या नेतृत्वाचें अस्तित्व मान्य करण्याचा ! काँग्रेसनें तें कधीं मानलें नाहीं. पण म्हातारीनें कोंबडा झांकला म्हणून सूर्योदय व्हायचा का थांबेल ? समाजवादी नेतृत्वाच्या उत्कर्षास म्हणूनच काँग्रेस-विरोधानें पायबंद बसला नाहीं.

काँग्रेस सोशलिस्ट पार्टी ३४ सालापासून काँग्रेसमध्येंच होती. समाजवादाचा प्रचार करीत असतां स्वातंत्र्याच्या लढाईत पार्टी सदैव आघाडीवर होती. परंतु समाजवादी विचारांचा हा गट काँग्रेसनेत्यांच्या डोळ्यांत सलूं लागला. तेव्हां काँग्रेसत्याग करून हा गट अलग

झाला. गेल्या दोनच वर्षांत समाजवादी पक्षानें केलेली कामगिरी व मिळविलेलें स्थान यांचा विचार केला तर काँग्रेसची जागा घेऊं शकणारा एवढा हाच एक पक्ष देशांत आहे असें मान्य करावें लागेल. समाजवादी पक्षाला मिळालेल्या या यशांत जयप्रकाशजींचा वांटा अर्थातच फार मोठा आहे.

## "हिंद का नेता"

जयप्रकाशजींचें नेतृत्व एका विशिष्ट वर्गापुरतें मर्यादित नाहीं. ते जेवढ्या कामगारांचें नेतृत्व करीत आहेत, तेवढे कामगार दुसऱ्या कुणाच्याहि मागें नाहींत. रेल्वेमेन्स फेडरेशन, डिफेन्स वर्कर्स फेडरेशन, पोस्ट व तार खात्याची भारतीय युनियन इतक्या संघटनांचे ते अध्यक्ष आहेत. हिंद मजदूर सभा स्थापन करण्यासाठीं जयप्रकाशजींनींच प्रयत्न केले. पण प्रत्येक वर्गाच्या लोकांनीं "हमारा नेता–जयप्रकाश" अशी घोषणा करावी अशी आज जयप्रकाशजींची स्थिति आहे. ते आज विरोधी पक्षाचें नेतृत्व करीत आहेत. आजचा रस्ता चूक आहे म्हणणारानें दुसरा रस्ता दाखविला पाहिजे. जयप्रकाशानीं हें काम चांगलेंच बजावलें आहे. जवाहरलालजींच्या खालोखाल जयप्रकाशजीं-इतकी लोकप्रियता असणारा पुढारी आज तरी भारतांत नाहीं.

## अष्टपैलू व्यक्तिमत्व

प्रकृती पूर्वींसारखी कणखर नसल्यानें ते आज जरा थकलेले दिसतात, परंतु त्यांच्याकडे एक नेत्रकटाक्ष फेंकला तरी मनाचें

समाधान होतें. साधेपणा हें तर त्यांचें वैशिष्ट्यच आहे. आणि त्यांचा संथपणा ! सर्व व्यवहार संथपणें चालतातच, पण बोलणेंहि तितक्याच सावकाशीचें ! त्यांच्या हृदयाची सरलता चेहऱ्यावर उमटलेली असते आणि भारतासारख्या खंडतुल्य देशाला समाजवादी बनविण्याची जबाबदारी त्यांच्या शिरावर असतांहि त्यांचें हास्य कधीं लोपत नाहीं.

तसें पाहिलें तर जयप्रकाश कांहीं पट्टीचे वक्ते नाहींत. शब्दांच्या फैरी झाडून आणि युक्तिवादांचे बॉंबगोळे फेंकून श्रोत्यांना वा प्रतिपक्षीयांना चीत करण्याची शक्ति त्यांच्याकडे नाहीं. परंतु त्यांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या शब्दांनीं श्रोता भारून जातो. अत्यंत मृदु आवाजांत ते बोलतात आणि भाषण चालू असतां श्रोत्यांनीं गडबडून जावें इतकी गति वक्तृत्वप्रवाहाला कधींच नसते. पण त्यांचें वक्तृत्व अनुभवलें कीं गंगेच्या प्रवाहाची आठवण झालीच म्हणूनच समजा. विचारांची खोली, मनाची विशालता, हृदयाचें पावित्र्य या साऱ्या गोष्टी तिथें आढळतील. टीकेचा भडिमार झाला तरी त्यांची शांति कधीं ढळत नाहीं कीं चिडून जाऊन ते वाटेल तें बोलत नाहींत. कोणत्याहि विषयावर ते बोलोत, त्या विषयाच्या गाभ्याला ते हात घालतील. जयप्रकाशांचा पिंडच तत्त्वनिष्ठ आहे. संघटनेंतील भोंगळपणा एकवेळ ते सहन करतील परंतु विचारांतील गोंधळ त्यांना सहन होणार नाहीं. सोशलिस्ट पार्टीच्या वार्षिक अधिवेशनांत त्यांनीं सादर केलेले अहवाल याची साक्ष देतील.

जयप्रकाश जसे जातिवंत वक्ते नसतां फड जिंकतात तसेच

जवाहरलालजींसारखे पट्टीचे लेखक नसतां लेखकांच्या जगांत त्यांना मानाची जागा आहे. जयप्रकाशानीं लिहिलेला एकच ग्रंथ आज भारतीय जनतेसमोर आहे. " Why Socialism " हा तो ग्रंथ होय. जसें त्यांचें वक्तृत्व तसें त्यांचें लिखाण. साधी भाषा, निर्दोष प्रतिपादन, आणि विषयाचें संपूर्ण ज्ञान या गुणत्रयींच्या सुंदर मिलाफामुळें हें पुस्तक म्हणजे समाजवादावरचा एक अधिकृत ग्रंथ बनला आहे. जयप्रकाशानीं " कॉंग्रेस सोशलिस्ट " मधून, किंवा नंतर " जनता " मधून कांहीं लिखाण केलें, पण त्यापलिकडे त्यांना कांहीं लिहिणें शक्य होत नाहीं. याचें कारण इतकेंच कीं संघटनात्मक कार्यांत त्यांचा सगळा वेळ निघून जातो आणि मनांत येणारे विचार कागदावर उतरवायला वेळच मिळत नाहीं.

जयप्रकाशांची प्रतिक्रिया फार उशीरां प्रकट होते. कुठल्याहि गोष्टीवर ते घाईघाईनें मतप्रतिपादन करीत नाहींत आणि म्हणूनच ते जेव्हां एकाद्या गोष्टीचें निदान करतात तेव्हां त्यांत भावनावेगाचा भाग फारच थोडा असतो. जयप्रकाशांच्या बोलण्यांत आणि वागण्यांत इतरांकडे सहसा न आढळून येणारी सुसंगति आढळून येते याचेंहि कारण हेंच ! पूर्ण विचारांतीं आपलें मत ते बनवतील आणि मग मात्र कोणाच्याहि समोर, परिणामाची फारशी खंत न करतां बेडरपणें बोलून दाखवितील. जवाहरलालजींच्या विरुद्ध ते सहसा कांहीं बोलत नाहींत, पण शासनसंस्थेच्या शिरोभागीं नेहरू असतां लोकशाहीचा संकोच होऊं लागल्याचें दृश्य जेव्हां त्यांनीं पाहिलें तेव्हां नेहरूंच्या राजधानींत,

नेहरूंच्या वाढदिवसाचे दुसऱ्याच दिवशीं जाहीररीत्या त्यानीं नेहरूंना असा इषारा दिला कीं, "हिंदमध्यें तुमच्या नेतृत्वाखालीं फॅसिझमचा उदय होत आहे." विरोधी पक्षाचें नेतृत्व करीत असतांहि जयप्रकाशांबद्दल पं. नेहरूंना आदर वाटतो, तो याचसाठीं. "भारताचें भवितव्य घडविण्यांत जयप्रकाश मोलाची कामगिरी करतील." असे जे उद्गार जवाहरलालजीनीं काढले तेहि त्याचमुळें! भय त्यांना माहित नाहीं. अडचणी त्यांना अडवूं शकत नाहींत. अपयश ते आव्हानासारखें मानतात. मद्रासच्या अधिवेशनांत बोलतांना ते म्हणाले, "येत्या निवडणुकींत पक्ष भरीव कामगिरी करील असें मला वाटतें. पण जरी पक्षाचा धुव्वा उडाला तरी त्यामुळें मी खचून जाणार नाहीं. अशा प्रकारचा निकाल हें मला आव्हान आहे असें मानून मी अधिक काम करायला प्रवृत्त होईन." योग्य दिशेनें प्रयत्नांची पराकाष्ठा करणें हीच गोष्ट ते यशापयशापेक्षां महत्त्वाची मानतात. अपयश मग त्यांच्याकडे जातेंच कशाला?

## एकमेव आशास्थान

आजचा समाज तर अधःपतित आहेच, पण शासनसंस्थाहि कार्यक्षम राहिलेली नाहीं. कारणें कांहीं असोत, स्वराज्यांत सुराज्या-ऐवजीं नोकरशाही स्थापन झाली आहे. कॉंग्रेसचे नेते या गोष्टींना पायबंद घालण्यास अपेशी ठरले आहेत. या पार्श्वभूमीवर जयप्रकाशजींचें कर्तृत्व उठून दिसतें. अमावास्येच्या रात्रींच चांदण्यांची शोभा अधिक असते नाहीं का? सर्वांनींच अपेक्षाभंग केल्यामुळें कुणावर श्रद्धा

ठेवायला जनता विचकत आहे. ती नास्तिक बनली आहे. पण त्या नास्तिकतेचा अर्थ इतका मर्यादित आहे कीं "नास्तिक" हा शब्द वापरणेंहि धाडसाचें ठरेल. जुन्या दैवतांवरील विश्वास उडाला आहे आणि विश्वास ठेवण्यायोग्य नवें दैवत आज हुडकलें जात आहे. जनतेचा विश्वास संपादन करून घेणारे लायक पुढारी आज हवे आहेत. पुढारी हल्लीं खूपच आहेत, पण जनतेचा विश्वास संपादन करण्यांत यशस्वी ठरलेले महाभाग मात्र दुर्मिळ आहेत. जयप्रकाशजींची गणना अशा दुर्मिळ पुरुषांतच करावी लागेल, कारण त्यानीं आपली लायकी सिद्ध केली आहे. त्यांच्यावर विश्वासून कामगारांनीं किंचित् बेफिकीर राहायलाहि हरकत नाहीं. कारण त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका घ्यायला त्यानीं जराहि जागा ठेवलेली नाहीं. गेल्या वर्षीचा एक प्रसंग यादृष्टीनें उद्बोधक आहे. रेल्वेचा संभाव्य संप रद्द झाला, यामुळें कांहीं लोक जयप्रकाशांवर रुष्ट झाले. पक्षाच्या हिताचा त्यानीं विचार केला नाहीं असें ते म्हणाले. पक्षाच्या सरचिटणीसपदावर असलेल्या जयप्रकाशानीं असें म्हणणारांना स्पष्टपणें बजावलें कीं, रेल्वेमेन्स फेडरेशन हा राजकीय पक्ष नसून कामगारांच्या हितार्थ लढण्यासाठीं संघटित झालेली ती कामगार संघटना आहे, हें प्रथम ध्यानांत घ्या. फेडरेशनचा अध्यक्ष या नात्यानें माझें प्रथम कर्तव्य एकाद्या राजकीय भूमिकेचा वा सिद्धांताचा प्रचार करणें हें असून त्यांच्या हितसंबंधाचें रक्षण करणें हें होतें. संप तहकूब करण्यानें कामगारांचा फायदाच झाला." कर्तव्यबुद्धीनें प्रेरीत झालेले कामगार पुढारी आज कुठें आहेत ? "झाले बहु, होतील बहु, परंतु यासम हा !" असें म्हण-

ण्याचा अनावर मोह होतो. जयप्रकाश एका पक्षांत असतील, पण तत्पूर्वी ते श्रमजीवी वर्गाचे नेते आहेत,-ही गोष्ट अशाप्रकारें त्यांनीं सिद्ध केली आहे. आणि म्हणूनच जयप्रकाश नारायण हे भारताचें एकमेव आशास्थान आहे.

खरोखरच जयप्रकाश म्हणजे भारताची आशा आहे. भारताच्या रोगाचें अचूक निदान त्यानीं केलें आहे, त्याच्यावरची उपाययोजना त्यानीं जाहीर केली आहे. गोंडस तत्त्वांचा केवळ पुरस्कार करून ते थांबत नाहींत. तीं प्रत्यक्षांत आणण्यासाठीं पडतील ते परिश्रम घ्यायची त्यांची तयारी असते. तत्त्वांच्या मनोऱ्याला संघटनेचा पाया ते घालून देतात आणि त्यामुळें त्यानीं केलेली तात्त्विक चर्चा म्हणजे बुद्धिविलास ठरत नाहीं. परिस्थितीचें आकलन करण्याची कुवत कितीहि असली तरी परिस्थिति पालटण्यासाठीं आवश्यक असलेली संघटना उभारतां येत नसेल तर तिचा काय उपयोग? जयप्रकाशानीं आपलें संघटनाकौशल्य गेल्या तीन वर्षांत अनेक प्रकारें सिद्ध केलें आहे. भारताची आशा बनण्याचें भाग्य, म्हणूनच त्यांना लाभलें आहे.

जयप्रकाश नारायण आज आपल्या स्वतःच्या तेजानें तळपत आहेत. चोहोंकडे अंधार दाटला असतां प्रकाशाचा एक किरण, अधःपाताच्या महासागरांत बुडत असतां आसरा देणारी नौका आणि दारिद्र्य, अज्ञान व पिळवणूक यांच्यापुढें आगतिक बनून शरण गेलेल्यांना उज्ज्वल भविष्याची ग्वाही देणारा धीरोदात्त नेता म्हणून

जयप्रकाश आज हिंदी राष्ट्रापुढें खडे आहेत. दिव्याभोंवतीं जसे प गोळा होतात, विकसित कमलपुष्पासभोंवार भ्रमर जसे घोंगावूं लाग तशा दारिद्र्यानें गांजलेल्या, पिळणुकीनें आगतिक बनलेल्या अ अपेक्षाभंगानें पोळलेल्या हिंदी बांधवांच्या आशा जयप्रकाशांभों केंद्रित होत आहेत. उलट मार्क्स व गांधीजी यांचे कांहीं वि घेऊन, त्यांत स्वतःची मोलवान भर घालून त्यांतून निर्माण झा लोकशाही समाजवादाचें अभिनव तत्त्वज्ञान घेऊन जयप्रकाश भारता मार्गदर्शन करीत आहेत. वर्गीय संघटनांच्या पायावर लोकशा समाजवादी राष्ट्राची मंझिल ते बांधीत आहेत. जयप्रकाशजींच्या प्रयत्नांतूनच भांडवलशाहीच्या रस्त्यानें विनाशाकडे चाललेल्या आ महायुद्धाच्या भोंवऱ्यांत गटंगळ्या खाणाऱ्या जगाला नवा संदे मिळणार आहे. जगाचें मार्गदर्शन करण्याची भारताची परंपर चालविणाऱ्या या थोर पुरुषाला शतशः प्रणाम !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. नं. ............

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. नं. ............
वाचनालय शाखा

क्र. ३८४४
आ. ०११

लोकशाही समाजवादी चळवळीस वाहिलेलें
कोंकणांतील एकमेव साप्ताहिक

रत्नागिरी जिल्हा सोशलिस्ट पार्टीचें मुखपत्र

# " समाजसत्ता "

संपादक : भाऊ तेंडुलकर

★

दर सोमवारीं नियमित प्रसिद्ध होतें

साडेचार रुपये भरून वार्षिक वर्गणीदार व्हा !

IRBK-0103844

व्यवस्थापक, समाजसत्ता, रत्नागिरी